प्रथम अपिल आदेश विलंबाने पारित केलेने
शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत ..

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/३१०८४०१/४३८/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:-१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.साप्रवि-१/रवाका/६९६/२०१६ दि १७/०६/२०१६

२. मा. राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ यांचेकडील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेल्या द्वितीय अपिल क्र रामाआ-नाशिक/द्वितीय अपिल क्र.२८१४/२०२१ अहमदनगर जा.क्र.ओ-२९०८ दिनांक ०४/१०/२०२४

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं), जि.प.अहिल्यानगर यांचेकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-१२/केमाअ/५९६/२५ दि १२/११/२०२५

४. श्री कल्याण शेळके यांचा खुलासा दिनांक २२/१२/२०२५

५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जि.प.अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-१२/केमाअ/६८०/२०२५ दिनांक १२/०१/२०२६

६. इकडील कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/३१०८४०१/१४०/२०२६ दिनांक ०९/०३/२०२६

७. गट विकास अधिकारी,पं.स.राहुरी यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था१/२६४/२६ दिनांक ११/०३/२०२६

८. श्री कल्याण शेळके, कनि सहा, पंचायत समिती राहुरी यांचेकडील खुलासा दिनांक ११/०३/२०२६

९. जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (२)

श्री कल्याण मारुती शेळके, कनिष्ठ सहाय्यक, हे ग्रामपंचायत विभाग, जि.प. अहिल्यानगर, येथे कार्यरत असतांना त्यांचेकडे ग्रामपंचायत विभागातील आवक-जावक विभागाच्या कार्यासनाचा कार्यभार सोपविण्यात आलेला होता. सदर कालावधीत श्री.वाघू शंकर टेकाळे, रा.पाथरे खुर्द, ता.राहुरी, यांनी माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये ग्रामपंचायत विभागातील दिनांक १९/१२/२०१४ ते दिनांक ०९/०२/२०१५ अखेर जावक नोंदवहीच्या संपुर्ण पानाची छायांकित प्रत मागणी केली होती. त्या अनुषंगाने श्री शेळके यांनी सदर माहिती अधिकार अर्जाची माहिती विहित कालावधीत दिली नाही. तसेच प्रथम अपिल अर्जावर सुनावणी उशिरा घेवुन प्रथम अपिल सुनावणीचा निर्णय श्री शेळके यांनी विलंबाने सादर केला आहे. यावरुन श्री शेळके यांनी कामकाजात अक्षम्य हलगर्जीपणा केल्याचे सिध्द झालेने संदर्भ क्रमांक २ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली.

संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री शेळके यांनी खुलासा सादर केला. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता श्री शेळके यांनी सादर केलेला खुलासा संयुक्तीक नसुन मोघम स्वरुपाचा असलेचे दिसुन आलेने श्री शेळके यांनी त्यांना नेमुण दिलेल्या कामकाजात अक्षम्य हलगर्जीपणा केलेचे सिध्द झाले. श्री शेळके यांनी

..२

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ नियम ४ (२) नुसार, श्री शेळके यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबत खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले.

संदर्भ क्रमांक ८ नुसार श्री शेळके यांनी खुलासा सादर केलेला आहे. श्री शेळके यांच्या खुलाश्याचे अवलोकन केले असता श्री शेळके यांचा खुलासा अंशत: मान्य करणेत येऊन कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केलेल्या शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. शेळके कल्याण मारुती, कनिष्ठ सहाय्यक यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने एक वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. शेळके कल्याण मारुती, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202605200400098 असा आहे.

Digitally signed by
Rahul Ashok Shelke
Date: 20-05-2026
15:10:09

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. शेळके कल्याण मारुती, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी

२/- सदरचा आदेश श्री. शेळके कल्याण मारुती, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत /--
(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर